<u>नि. फौ. ख. क्र. १०१/२०११</u> निशाणी १६०

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.५ यांचा शपथेवर जबाब</u>**

**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – जनार्धन दामोदर पोहरे

वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती,

पत्ता – रा. उरळ, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>फिर्यादीतर्फे वकिल श्री. एल. एस. बेदरकर यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी सन २००३ ते २०२५ या कालावधीमध्ये होमगार्ड मध्ये मानसेवी होमगार्ड म्हणून कार्यरत होतो. मी पुन्हा सांगतो की, सन २००३ ते २०२४ या कालावधीमध्ये मानसेवी म्हणून होमगार्ड मध्ये कार्यरत होतो. दि.१३.११.२०११ मध्ये उरळ पो.स्टे. येथे होमगार्ड म्हणून माझी नियुक्ती होती, त्यावेळी मी उरळ पोलीस ठाणेदार यांच्या आदेशानुसार कर्तव्य करीत होतो. न्यायालयात हजर असणारे अशोक ताथोड व सुनिता ताथोड यांना मी ओळखतो. मी शुभम ताथोड यांना देखील ओळखतो, तो आज न्यायालयात हजर नाही. शुभम मयत झाला आहे, याबाबत मला माहिती नाही. मी उरळ पो.स्टे. येथे दि.१३.०३.२०११ रोजी कार्यरत असताना त्या दिवशी आमचा कारंजा येथे परिक्षा बंदोबस्ताकामी हजर होतो. बंदोबस्तावरुन मी पो.स्टे. येथे आलो असता पो.स्टे. येथे हजर असणारे स्टेशन डायरी अंमलदार यांनी मला सांगितले की, अशोक विठ्ठल ताथोड, सुनिता अशोक ताथोड व शुभम ताथोड यांना अकोला येथील मुख्य हॉस्पीटल येथे वैद्यकीय उपचाराकरीता घेऊन जाण्यास सांगितले. त्या तिघांना देखील मार लागलेला होता, तो मी पाहिला. पो.स्टे. येथून मला जखमींना उपचाराकरीता घेऊन जाण्याकरीता जखमी रिपोर्ट दिला होता. त्यानुसार, मी त्यांना अकोला येथील मुख्य दवाखान्यात घेऊन गेलो व त्यांना वैद्यकीय तपासणीकरीता तेथे हजर असलेल्या डॉक्टरांकडे हजर केले. त्यांची वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर त्यांना पुन्हा उरळ पो.स्टे. येथे घेऊन आलो.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांचे मार्फत उलटतपासः</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, उरळ पो.स्टे. ला लागून सरकारी दवाखाना आहे. हे म्हणणे खरे आहे की, उरळ पो.स्टे. येथे येणारे जखमींना शेजारी असलेल्या सरकारी दवाखान्यामध्ये वैद्यकीय तपासणीकरीता पाठवितात. जखमी महिलेस वैद्यकीय

उपचाराकरीता घेऊन जाण्याकरीता महिला अधिकारी/पोलीस लागते, याबाबत मला माहित आहे. आज न्यायालयामध्ये पुरावा देण्यापुर्वी मी उरळ पो.स्टे. येथे जावून जखमींच्या वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत कोणतीही चौकशी केली नाही.

३. मी दि.१३.११.२०११ रोजी ज्या ठिकाणी परीक्षा केंद्रावर बंदोबस्त कामी होतो, त्या ठिकाणी पेपर किती वाजेपर्यंत होता, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशोक ताथोड यांच्यासोबत माझा गेले २० वर्षांपासून परिचय आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशोक ताथोड यांनी मला साक्ष देण्याकामी न्यायालयात बोलाविले आहे. आज न्यायालयात तारीख आहे, याबाबतची माहिती मला सुनिता ताथोड फोनद्वारे सांगितले, त्यानुसार मी त्यांच्या सांगण्यानुसार आज न्यायालयात आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुनिता ताथोड यांना मी न्यायालयात साक्ष कोणत्या केसकामी व कशाबद्दल आहे, याची विचारणा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात प्रलंबित असलेले प्रकरण मी आल्यानंतर पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पो.स्टे. येथे जाऊन कागदपत्रांची पाहणी केली नाही तसेच न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाची पाहणी केली नसल्याने मी सुनिता ताथोड यांच्या सांगण्यानुसार आज न्यायायलात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २००३ ते २०२४ या कालावधीमध्ये होमगार्ड येथे कार्यरत होतो, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१३.०३.२०११ रोजी मी कारंजा येथे परिक्षा केंद्रावर बंदोबस्ताकामी होतो, हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यानकथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात फिर्यादीच्या सांगण्यानुसार खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ३१.१०.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.01 10:58:51 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ३१/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ३१/१०/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०१/११/२०२५ |